Annexure-I

MSRDC

**CERTIFIED TRUE COPY OF THE EXTRACT OF THE RESOLUTION PASSED BY THE BOARD OF DIRECTORS OF MAHARASHTRA STATE ROAD DEVELOPMENT CORPORATION LIMITED IN THEIR ONE HUNDRED AND SEVENTY SEVENTH MEETING HELD ON SATURDAY, JULY 04, 2020 AT MSRDC LTD. AT MSRDC LTD. RAJIV GANDHI SEA LINK PROJECT OFFICE, OPP. BANDRA RECLAMATION BUS DEPOT, K. C. MARG, BANDRA (WEST), MUMBAI 400 050 FROM 12.30 P.M. TO 1.30 P.M. THROUGH VIDEO CONFERENCE**

AGENDA NO. 14

A) **TAKING OVER DEVELOPMENT, COORDINATION AND IMPLEMENTATION RESPONSIBILITIES OF MULTI MODAL CORRIDOR (MMC) FROM VIRAR TO ALIBAUG (NAVGHAR TO BALAVALI PHASE-I AND BALWALI TO ALIBAG PHASE-II) FROM MMRDA BY MSRDC.**

B) **HANDING OVER DEVELOPMENT, COORDINATION AND IMPLEMENTATION RESPONSIBILITIES OF CONSTRUCTION OF TWIN TUBE, 3 LANES EACH HIGHWAY TUNNEL CONNECTING TIKUJINIWADI IN THANE CITY TO BORIVALI ON WESTERN EXPRESS HIGHWAY FROM MSRDC TO MMRDA.**

Shri. A.B. Gaikwad, Joint Managing Director (Engineering – I), attended the meeting.

The Board noted the contents of the agenda papers.

A) The Board was informed that currently the proposed Hindu Hriday Samrat Balashaheb Thackeray Maharashtra Samruddhi Mahamarg ("Samruddhi Mahamarg") does not have a direct connectivity with Jawaharlal Nehru Port Trust ("JNPT") and MSRDC has to totally depend on the Vadodara Mumbai Expressway (VME) spur to be developed by National Highway Authority of India ("NHAI") in future which is at a very primitive stage. Hence, it was strongly felt that NHAI may not be able to complete VME spur at pace of Samruddhi Mahamarg. In view of the above, it was felt that MSRDC cannot afford to depend on NHAI to timely complete the VME spur and compromise with Nagpur-Mumbai Super Communication Expressway's main objective of enhancing Agri-Trade in the regions of Vidarbha, Marathwada & North Maharashtra by providing them with expressway connectivity to JNPT. Considering the situation it was felt that there is an immediate need to work out an alternate to Samruddhi Mahamarg-JNPT connectivity link.

The Board was further informed that currently Mumbai Metropolitan Region Development Authority ("MMRDA") is developing Multi Modal Corridor between Virar to Alibag (Navghar to Balavali-Phase-I and Balwali to Alibag Phase-II). Apart from providing JNPT connectivity to Samruddhi Mahamarg, Multi Modal Corridor ("MMC") will also be a vital link to join the proposed Konkan Expressway starting point at Chirle near Panvel (Balwali) with JNPT, Nagpur Mumbai Super Communication Expressway, Mumbai Trans-Harbour Link (MTHL) and Vadodara -Mumbai Expressway. In addition to the above, MMC will connect Major Roads like NH8, NH3, Shil - Kalyan Road, NH-4, MPEW, NH-4B, NH-17,etc. MMC will also connect Major Projects like Navi Mumbai International Airport, Dedicated Freight Corridor, Rewas Port, etc.

B) The Board was informed that the Cabinet Committee meeting for Infrastructure, headed by the Hon'ble Chief Minister; held on 30.11.2015 decided to implement the Tikujiniwadi - Borivali Tunnel Project and accorded approval for preparation of feasibility studies and preparation of Detailed Project Report and has declared MSRDC as an Implementing agency for the said project .

The Tunnel would connect on both the side of the Sanjay Gandhi National Park connecting Eastern and Western Expressway.

The Board was further informed that since MMRDA was handling the Metropolitan Region Development works, the development of this corridor by MMRDA will enhance the benefits of the corridor.

After detailed deliberations, the Board passed the following resolution unanimously:

"**RESOLVED THAT** the consent of Board of Directors be and is hereby accorded to accept the proposal of taking over of Development, Coordination and Implementation Responsibilities of Multimodal Corridor from Virar to Alibag from Mumbai Metropolitan Region Development Authority ("MMRDA") to the Maharashtra State Road Development Corporation ("MSRDC").

**RESOLVED FURTHER THAT** the consent of Board of Directors be and is hereby accorded to accept the proposal of Handing over Development, Coordination and Implementation Responsibilities of Construction of Twin Tube, Three Lanes each Highway Tunnel connecting Tikujiniwadi in Thane City to Borivali on Western Express Highway from MSRDC to MMRDA.

**RESOLVED FURTHER THAT** Vice Chairman & Managing Director is hereby authorized to do all such acts, deeds and things as may be deemed necessary to give effect to the said resolution inter-alia take all appropriate necessary actions for the same from time to time."

The Board of Directors accorded their consent to approve the said matter without waiting for the confirmation of the minutes of this meeting.

**For Maharashtra State Road Development Corporation Limited**

Prasad Sawant
**Company Secretary**
**ACS 33104**

Annexure-III

गोपनीय

क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१४९

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई — ४०० ०५१.

दिनांक : १७ ऑगस्ट, २०२०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०७ जुलै, २०२० (मंगळवार) रोजी झालेल्या १४९व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य व निमंत्रित

प्रत अग्रेषित :-

मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १४९व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ०७ जुलै, २०२० (मंगळवार) |
| वेळ | : | दुपारी १२.३० वाजता |
| स्थळ | : | समिती कक्ष, ९वा मजला,<br>मुं.म.प्र.वि.प्रा. नविन इमारत,<br>वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई – ४०० ०५१.<br>दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. एकनाथ शिंदे<br>माननीय मंत्री, नगर विकास | - | अध्यक्ष |
| डॉ. जितेंद्र आव्हाड<br>माननीय मंत्री, गृहनिर्माण | - | सदस्य |
| श्री. प्राजक्त तनपुरे<br>माननीय राज्यमंत्री, नगर विकास | - | सदस्य |
| श्रीमती किशोरी पेडणेकर<br>माननीय महापौर,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्या |
| श्री. यशवंत जाधव<br>अध्यक्ष, स्थायी समिती व<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. रवी राजा<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. संजय कुमार<br>मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. प्रविण परदेशी<br>अपर मुख्य सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |

..२/-

श्री. आय.एस.चहल - सदस्य
महापालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. आर.ए.राजीव - सदस्य-सचिव
महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

<u>निमंत्रित :</u>

कुमारी योगिता पारधी
अध्यक्षा,
रायगड जिल्हा परिषद

श्रीमती भारती कामडी
अध्यक्षा,
पालघर जिल्हा परिषद

श्री. महेश पाठक
प्रधान सचिव,
नगर विकास विभाग व
(विशेष प्रकल्प) सामान्य प्रशासन विभाग

श्री. आर.एल.मोपलवार
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

बैठकीच्या सुरुवातीस, माननीय मंत्री, नगर विकास व अध्यक्ष, प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

तसेच महानगर आयुक्त यांनी माननीय डॉ.जितेंद्र आव्हाड, मंत्री, गृहनिर्माण, माननीय श्री. प्राजक्त तनपुरे, राज्यमंत्री, नगर विकास, माननीय श्रीमती किशोरी पेडणेकर, महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री. संजय कुमार, मुख्य सचिव, श्री. प्रविण परदेशी, अपर मुख्य सचिव (१), नगर विकास विभाग, श्री. आय.एस.चहल, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे प्राधिकरणाचे नवे **"पदसिध्द सदस्य"** म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

..३/-

कारकिर्दीतील आणि सद्यस्थितीत प्राधिकरणांतर्गत सोपविण्यात आलेल्या प्रकल्पावरील कामकाजाचा अनुभव विचारात घेता श्री. पी.आर.के.मुर्ती, "संचालक (प्रकल्प)-मेट्रो" यांच्या सेवेचा कालावधी एक वर्ष म्हणजेच दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत वाढविण्यास प्राधिकरणाने मंजूरी दयावी अशी प्राधिकरणास विनंती आहे.

३०.३ त्यानंतर, प्राधिकरणाने उपरोक्त प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१५४५:</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७९ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाऱ्याचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे मेट्रो प्रकल्प विहित कालावधीत विनाविलंब पूर्ण करण्याच्या दृष्टीने श्री. पी.आर.के.मुर्ती, संचालक (प्रकल्प) यांच्या पूर्वीच्या कारकिर्दीतील आणि सद्यस्थितीत प्राधिकरणांतर्गत सोपविण्यात आलेल्या प्रकल्पावरील कामकाजाचा अनुभव विचारात घेता, संचालक (प्रकल्प) या पदावरील कालावधी दिनांक ३०.०६.२०२१ पर्यंत वाढविण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबधी योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.३१ : <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ जानेवारी, २०२० ते दिनांक ३० जून, २०२०.</u>

३१.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने दिनांक १ जानेवारी, २०२० ते दिनांक ३० जून, २०२० दरम्यान केलेल्या गुंतवणूक अहवालासंबंधी माहिती दिली.

३१.२ त्यानंतर दिनांक १ जानेवारी, २०२० ते दिनांक ३० जून, २०२० या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

बाब क्र.३२: <u>माननीय अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले विषय :</u>

महानगर आयुक्त व सदस्य सचिव यांनी माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सह-व्यवस्थापकीय संचालक-१, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी पत्र

..११५/-

क्र.MSRDC/MMC/२४५३/२०२०, दिनांक ०६ जुलै, २०२० अन्वये खालील प्रस्ताव प्राप्त झाल्याचे नमूद करून सदर प्रस्ताव विचारार्थ सादर केला :-

महाराष्ट्र शासनाने "नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग" अर्थात "हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी मार्ग" प्रकल्पाच्या कामाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पाची आर्थिक प्रगती २५% हून अधिक असून डिसेंबर, २०२१ पर्यंत समृध्दी मार्ग प्रकल्पाचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर समृध्दी मार्गास जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टशी (JNPT) थेट जोडणी उपलब्ध नसल्यामुळे सदर जोडणीकरीता म.रा.र.वि.महामंडळ यांना भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेद्वारे राबविण्यात येत असलेल्या वडोदरा-मुंबई महामार्ग प्रकल्पावर अवलंबून रहावे लागत आहे. परंतु, वडोदरा-मुंबई महामार्ग प्रकल्पाच्या कामामध्ये भू-संपादनाशी निगडीत मंजुरी प्रक्रिया प्रगतीपथावर असल्यामुळे त्याचा परिणाम समृध्दी महामार्ग प्रकल्प पूर्णत्वाच्या कामावर होण्याची शक्यता आहे.

प्राधिकरणाद्वारे राबविण्यात येत असलेला विरार ते अलिबाग (टप्पा-१ नवघर ते बलावली आणि टप्पा-२ बलावली ते अलिबाग) असा बहुउद्देशी मार्गिका (Multi Modal Corridor) प्रकल्प हा म.रा.र.वि.महामंडळाद्वारे राबविण्यात येत असलेल्या समृध्दी महामार्ग आणि कोंकण महामार्ग या दोन प्रमुख प्रकल्पांकरीता महत्त्वाचा दुवा आहे. सदर प्रकल्पांकरीता म.रा.र.वि.महामंडळाद्वारे समृध्दी महामार्ग पुढीलप्रमाणे बहुउद्देशीय मार्गिकेशी जोडण्यात येणार आहे :-

- समृध्दी महामार्ग अमने येथे समाप्त होऊन तो NH१६० वरील वडापे येथे जोडण्यात येईल त्यानंतर त्यास NH१६० वरील कशेळी येथील बहुउद्देशी मार्गिकेशी जोडणी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.
- त्यामुळे समृध्दी महामार्गावरील कशेळी ते वहाळ येथून येणारी मालवाहतूक बहुउद्देशीय मार्गिकेद्वारे नेता येणे शक्य होईल आणि त्यानंतर वहाळ येथून NH ३४८A मार्गे जे.एन.पी.टी.ला पोहोचणे शक्य होईल.

त्याचप्रमाणे प्राधिकरणाद्वारे महानगर प्रदेशातील विकासाकरीता अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत मुंबईतील पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाला जोडणारा टिकूजीनीवाडी-बोरिवली टनेल प्रकल्प शासनाने म.रा.र.वि.महामंडळाद्वारे राबविण्याचे

प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या व्यवहार्यता अभ्यास आणि विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याकरिता म.रा.र.वि.मंडळाद्वारे M/s. AECOM Asia Company Ltd., यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकल्पामुळे पूर्व व पश्चिम उपनगरांना थेट जोडणी उपलब्ध होणार असून ठाणे ते बोरिवली असा १.५ तासांचा प्रवास १५ मिनिटांनी कमी होईल. पूर्व व पश्चिम उपनगरांना जोडण्याकरीता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान टनेल हा प्रकल्प महत्त्वाचा दूवा ठरेल.

उपरोक्त बाबींचा विचार करीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी विरार ते अलिबाग या बहुउद्देशीय मार्ग प्रकल्पाचा (Multi Modal Corridor) विकास, समन्वयन आणि अंमलबजावणीची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना हस्तांतरित करावा असे उपरोक्त पत्रात नमूद केले आहे.

त्याचप्रमाणे ठाण्यातील टिकूजीनीवाडी ते पश्चिम द्रुतगती महामार्गावरील बोरिवली येथे जोडणारा आणि प्रत्येकी तीन मार्गिका असणारा ट्विन टनेल ट्युब प्रकल्पाचा विकास, समन्वयन आणि अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावी असे देखील उपरोक्त पत्रात नमूद केले आहे.

याबाबत दिनांक ०४.०७.२०२० रोजी झालेल्या १७७व्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. १५४६ मंजूर करण्यात आला आहे.

तरी याबाबत प्राधिकरणाने योग्य तो निर्णय घ्यावा व तसा ठराव मंजूर करावा अशी विनंती आहे.

**निर्णय: चर्चेनंतर, उपरोक्त प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला:-**

<u>ठराव क्र.१५४६:</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण राबवित असलेला विरार ते अलिबाग पर्यंतचा बहुउद्देशीय मार्गिकेचा विकास, समन्वय आणि अंमलबजावणीची जाबाबदारी प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडे हस्तांतरित करणे व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ राबवित असलेला टिकूजीनीवाडी, ठाणे ते पश्चिम द्रुतगती महामार्गावरील बोरिवली येथे जोडणारा आणि प्रत्येकी तीन मार्गिका असणारा ट्विन टनेल ट्युब प्रकल्पाचा विकास, समन्वयन आणि अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडून प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत."

त्यानंतर, माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********

Annexure - III

**Handing Over – Taking Over between**

**Executive Engineer**
**Maharashtra State Road Development Corporation (MSRDC)**
**&**
**Executive Engineer**
**Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA)**

विषय : **ठाणे शहरातील टिकुजीनी वाडी ते बोरीवली अशा सहापदरी (३+३ मार्गिकेचे २ बोगदे) भुयारी मार्गाचे बांधकाम करणे.**
**विषयांकित प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना हस्तांतरीत करणेबाबत.**

संदर्भ : **म.रा.र.वि.महामंडळाची संचालक मंडाळाची दि. ०४.०७.२०२० रोजी झालेली बैठक**

- **म.रा.र.वि.महामंडळच्या संचालक मंडळाची व मा. मंत्रीमंडळाच्या पायाभुत सुविधा समितीची मान्यता.**
  - ठाणे ते बोरीवली हे अंतर पार करण्यासाठी ठाणे शहरातील टिकुजीनी वाडी ते बोरीवली अशा सहापदरी (३+३ मार्गिकेचे २ बोगदे) भुयारी मार्गाचे बांधकाम म.रा.र.वि.महामंडळामार्फत हाती घेण्याच्या प्रस्तावास दिनांक २३ सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या १५०व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.
  - सदर प्रकल्प महामंडळामार्फत हाती घेण्याबाबत मा. मंत्रीमंडळाच्या पायाभुत सुविधा समितीच्या दिनांक ३०.११.२०१५ रोजीच्या बैठकीत चर्चा होवून सदर प्रकल्पासाठी महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले आहे.

➢ **सल्लागार नेमणुक व सल्लागाराने सादर केलेला प्राथमिक अहवाल :**

- सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले होते.
- सदर प्रकल्पाचा सविस्तर सुसाध्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ सल्लागार म्हणून मे. ऐइकॉम ऐशिया कंपनी लिमिटेड यांची दिनांक ११.०४.२०१६ रोजी नेमणूक करण्यात आली आहे.
- सल्लागाराने बोगद्याचा प्राथमिक अहवाल महामंडळास ऑक्टोबर २०१८ मध्ये सादर केला.
- सदर बोगद्याची एकूण लांबी १०.२५ किमी.
- जोडरस्त्याची लांबी १.५५ किमी.
- सल्लागाराने सादर केलेल्या प्राथमिक सुसाध्यता अहवालानुसार सदर प्रकल्पाची बांधकाम किमंत रु. ८९८५ कोटी इतकी आहे.
- सदर प्रकल्पाचा प्रारुप सविस्तर प्रकल्प अहवाल सल्लागाराने दि. ३०.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये महामंडळास सादर केला.

➢ **प्रकल्पासाठी लागणाऱ्या परवानग्या व सद्य:स्थिती :**

- सदर प्रकल्प हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून जात असल्याने बोगद्याच्या सर्वेक्षण करण्याच्या प्रस्तावावर दिनांक ३१.०१.२०१८ रोजी झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या १३ व्या बैठकीत चर्चा झाली असून दिनांक १४.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांनी सर्वेक्षणाची परवानगी दिली असून सर्वेक्षणाचे व बोअर होलचे काम पुर्ण करण्यात आले आहे.
- बोगद्याचा भाग हा संरक्षीत वन क्षेत्रातुन जात असल्याने बोद्याच्या खोदकामासाठी कोणते तंत्रज्ञान वापरणे योग्य होईल याकरीता Natioanl Institue of Rock Mechanics यांच्या मार्फत अभिप्राय मागविला असता त्यांनी संर्रक्षत वनक्षेत्र असल्यामुळे Tunnel Baring Machine च्या सह्यायाने बोगद्याचे खोदकाम करण्याचे कळविले आहे.

➢ सद्य:स्थिती :

| अ.क्र. | लागणाऱ्या परवानग्या | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १. | पर्यावरण व वनविभागाच्या दिनांक १९.१२.२०१२ च्या अधिसुचनेनुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परीसरातअसल्याने नॅशनल बोर्डऑफ वाईल्ड लाईफची (NBWL) परवानगी | नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफचा (NBWL) परवानगी मिळविण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक २२.०९.२०१८ रोजी ऑनलाईन पद्धतीने व दिनांक २४.०९.२०१८ रोजी मुख्य वन संरक्षक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांना सादर केला असुन दिनांक ०८.०४.२०१९ रोजी वरिष्ठ अधिकारी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान तसेच श्री. बिलाल हबीब, वैज्ञानिक, नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफ, देहरादून यांच्या समवेत स्थळ पाहणी केली असून वनप्राणी संरक्षणासाठी Mitigation Measures वर श्री. बिलाल हबीब यांनी सुचना दिल्या आहेत व त्याच्या अमलबजावणीसाठी अंदाजपत्रकात तरतुदी करण्यात येत आहेत. |
| २. | वनजमिन वळती करण्याबाबतचा प्रस्ताव | वनजमिन वळती करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २६.१२.२०१७ रोजी ऑनलाईन पद्धतीने Ministry of Environment, Forest and Climate Change च्या वेबसाईट वर व दिनांक १०.०१.२०१८ रोजी मुख्य वन संरक्षक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांना सादर केला असुन दिनांक २७.०३.२०१९ रोजी वरिष्ठ अधिकारी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांच्या समवेत स्थळ पाहणी केली आहे. वनजमिन वळती करण्याबाबतचा प्रस्ताव हा मुख्य वनसरक्षक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांच्याकडे ३०.०५.२०१९ रोजी सादर केला असून त्यांनी दिनांक २४.०६.२०१९ रोजी त्रूटी पुर्तता करण्याबावत पत्र दिले असून सदर त्रुटींची पुर्तता दिनांक ०४.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांना सादर केले आहे. |
| ३. | खाजगी जागेचा भूसंपादनाचा प्रस्ताव | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यावर योग्य तो प्रस्ताव सादर करण्यात येईल. |

➢ सल्लागाराचा **Payment schedule :**

❖ सल्लागार मे. ऐइकॉम ऐशिया कंपनी लिमिटेड यांची दिनांक ११.०४.२०१६ रोजी महामंडळामार्फत नेमणूक करण्यात आली असून सदर कामासाठी त्यांचे रु.८,५४,७५,६२९/- (सर्विस टॅक्स वगळून) इतक्या रकमेची निविदा महामंडळाने मान्य केली होती.

❖ निविदेच्या अटी व शर्ती प्रमाणे सल्लागाराचा Payment schedule खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description | Payment | Amount as per tender (in Rs.) | Payment given to the consultant till date (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | On submission of Inception Report | 5% | 42,73,781/- | 42,73,781/- |
| 2 | On submission of draft feasibility report including strip plan and utility relocation plan | 10% | 85,47,563/- | 85,47,563/- |
| 3 | On submission of draft preliminary project report and land acquisition report | 25% | 2,13,68,907/- | 2,13,68,907/- |
| 4 | On submission of Draft Detailed Project Report and land Bidding Document | 20% | 1,70,95,126/- | - |
| 5 | On approval of Final Detailed Project Report and Bidding Document | 20% | 1,70,95,126/- | - |
| 6 | On submission of required project clearances form the concerned agencies | 20% | 1,70,95,126/- | - |
| | | Total | 8,54,75,629/- | 3,41,90,252/- |

- ❖ वरील रक्कमे पैकी आजअखेर पर्यंत महामंडळामार्फत सल्लागार मे. ऐइकॉम ऐशिया कंपनी लिमिटेड यांनावरील तकत्यातील अ.नु.क्रं. १, २ व ३ च्या कामासाठी रु. ३,४१,९०,२५२/- इतके देयक अदा करण्यात आले आहेत.
- ❖ सल्लागाराने सदर प्रकल्पाचा प्रारुप सविस्तर प्रकल्प अहवाल महामंडळास सादर केला आहे. तसेच सल्लागाराने प्रकल्पाचा प्रारुप सविस्तर प्रकल्प अहवाल व प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या परवानगी मिळण्यासाठी केलेल्या कामासाठी रु.२,५६,४२,६८९/- चे देयक महामंडळास सादर केले असुन सदरचे देयक म.रा.र.वि.महामंडळामार्फत देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
- ❖ सल्लागाराची उर्वरीत रु.२,५६,४२,६८८/- चे देयक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अदा करावे.

➢ **वन विभागातील सेवा निवृत्त अधिकारी श्री. विजय आर. सिंग, IFS(Retired) यांची नेमणूक व त्यांचा Payment schedule :**

- ❖ सदरचा प्रकल्प संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून जात असल्याने प्रकल्पासाठी लागणाऱ्या परवानगी लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी महामंडळाने वन विभागातील सेवा निवृत्त अधिकारी श्री. विजय आर. सिंग, IFS(Retired) यांची नेमणूक महामंडळाने पत्र दिनांक १६.०८.२०१६ अन्वये करण्यात आली होती.
- ❖ या कामासाठी रु.१५,००,०००/- इतके देयक देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यांचा Payment schedule खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description/Activities | Payment | Amount as per agreement (in Rs.) | Payment given to the consultant till date (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Obtaining permission for survey & investigation | 10% of total fees | 1,50,000/- | 1,50,000/- |
| 2 | Obtaining forest clearance (FDP) & National Board Wild Life Clearance | 90% remaining as per the agreement executed on 5th July 2016. | 13,50,000/- | 1,50,000/- |
| | **Balance Payment to be given to Mr. V.R. Singh, IFS (Retired)** | | | **12,00,000/-** |

- ❖ श्री. विजय आर. सिंग, IFS(Retired) यांनी प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या वन विभागामार्फत परवानगी मिळण्यासाठी केलेल्या कामासाठी रु.३,५४,०००/- चे देयक महामंडळास सादर केले असुन सदरचे देयक म.रा.र.वि.महामंडळामार्फत देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
- ❖ श्री. विजय आर. सिंग, IFS(Retired) यांचे उर्वरीत रु.९,९६,०००/- चे देयक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी अदा करावे.

➢ **प्रकल्प हस्तांतरण करण्याबाबत म.रा.र.वि.महामंडळाच्या संचालक मंडळाने दिलेली मान्यता.**

- ❖ दि. ०४.०७.२०२० रोजी झालेल्या म.रा.र.वि.महामंडळाची संचालक मंडळाच्या बैठकीत सदरचा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना हस्तांतरीत करण्याबाबत मंजूरी दिली आहे.
- ❖ संचालक मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार सदर प्रकल्प हा पुढील कार्यवाहीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना हस्तांतरीत करण्यात येत आहे.

➢ **हस्तांतरीत करावयाच्या नस्तींची यादी.**

| **Name of File** |
|---|
| Tender File |
| Board Note |
| Construction of Tunnel between Tikujiniwadi Thane and Sanjay Gandhi National Park, Boriwali.**Incorporating project in the Regional Plan of Mumbai Metropolitan Region.** |
| Wild Life permission |
| Correspondence with MCGM |
| Release Mobilization Advance |

| Name of File |
| --- |
| Inspection Report |
| Bill File –M/s. AECOM Asia Company Ltd. |
| Environmental Clearance |
| V.R. Singh Payment |

**Hard Copy**

1. Feasibility Report
2. Social Impact Assessment (SIA) Report – August 2019
3. Annexures – August 2019
4. Geotechnical Investigation Report
5. Land Acquisition Plan (LAP) report – August 2019
6. Preliminary Poject Report – August 2019
7. Drawing Volume
8. Social Impact Assessment (SIA) Report – June-2020

**Soft copy**

1. Highway Tunnel Project Tikujiniwadi-Borivali - Geotech Report
2. REQUEST FOR PROPOSAL (RFP)- CONSULTANCY SERVICES OCTOBER 2015

| Handed over by | Taken over by |
| --- | --- |
| 21/8/20. | |
| **Executive Engineer** | **Executive Engineer** |
| **Maharashtra State Road Development Corporation (MSRDC)** | **Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA)** |